# सौरभ कोरगांवकर

# मी पाहिलेला

# देवगड सिंधुदुर्ग



# मी पाहिलेला देवगड-सिंधुदुर्ग

सौरभ दिलीप कोरगांवकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# मी पाहिलेला देवगड-सिंधुदुर्ग

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओोळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मी पाहिलेला देवगड-सिंधुदुर्ग

लेखक:- सौरभ दिलीप कोरगांवकर.

पत्ता: दादा-साहेब फाळके मार्ग, दादर पूर्व, मुंबई ४०००१४

संपर्क ई-मेल: saurabhdkorgaonkar@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पूनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com


esahity@gmail.com

प्रकाशन : २० डिसेंबर २०१९



- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

लेखक परिचय



संपूर्ण नाव: सौरभ दिलीप कोरगांवकर

पत्ता: दादा-साहेब फाळके मार्ग, दादर पूर्व, मुंबई ४०००१४

संपर्क ई-मेल: saurabhdkorgaonkar@gmail.com

संगणक अभियांत्रिकीमध्ये भारतातून पदवीधर झाल्यानंतर अमेरिकेतून संगणक अभियांत्रिकीमध्येच मास्टर पदवी प्राप्त केली.

संगणक क्षेत्रात खाजगी कंपनीत नोकरी करतो आहे.

गेली ५ वर्षे अमेरिकेत स्थायिक.

लिखाणाबरोबरीनेच काल्पनिक आणि भयकथा आणि अध्यात्मिक पुस्तके वाचण्याची आवड. रत्नाकर मतकरी, नारायण धरप यांची गूढ कथेवर आधारित पुस्तके वाचण्याची विशेष आवड. सध्या अध्यात्मिक आणि ज्योतिषावरील संशोधनात्मक लेख लवकरच प्रकाशित करण्याचा मानस.

प्रवासाची आवड आणि विशेष करून निसर्ग सौंदर्याचे छायाचित्रण करण्याचा छंद आहे.

# प्रस्तावना:

दोन वर्षे अमेरिकेत असताना तेथील बराचश्या भागात माझे फिरणे झाले होते. परदेशात जाऊन फिरण्याची सर्वांना ओढ असते . त्यांची संस्कृती, राहणीमान यात आपल्याला एक प्रकारचे आकर्षण असते परंतु भारतातील आणि खास करून महाराष्ट्रातील असंख्य पर्यटन स्थळाबद्द्ल आपल्याला पुसटशी कल्पना देखील नसते. प्रवासातूनच आपल्याला नवीन मित्र, नवीन गोष्टी आणि नवीन कथा अनुभवास मिळतात आणि आपली नव्याने ओळख निर्माण होते. देवगड-सिंधुदुर्गामध्ये तीर्थक्षेत्र असो किंवा सागरी तट, संथ पाण्याच्या प्रवाह, हापूस आंबा, धबधबा, किल्ले अशा बऱ्याच ठिकाणी मला भेट देता आली जिथे निसर्गाने सौंदर्याच्या बाबतीत कशाचीही कमतरता ठेवली नव्हती. तेथील संस्कृती, इतिहास, पार्श्वभूमी याची माहिती मला घेता आली आणि ती या लेखाद्वारे तुमच्या समोर आणण्याचा हा माझा प्रयत्न. भारतात येऊन मित्रांबरोबर सिंधुदुर्ग-देवगडमध्ये घालवलेले क्षण हे अविस्मरणीय होते आणि ते कायम स्मरणात राहावे याकरता प्रवास वर्णन या लेखाद्वारे ते आपल्यासमोर घेऊन येत आहे.

हे पुस्तक माझे संपूर्ण कुटुंब, मित्रमंडळी

आणि प्रवासाची आवड असणाऱ्या सगळया हौशी पर्यटकांना

समर्पित

सौरभ दिलीप कोरगांवकर


मी पाहिलेला देवगड-सिंधुदुर्ग

# सुपंथ



मी तब्बल दोन वर्षांनी अमेरिकेतून वेळ काढून मुंबईत काही आठवडे सुट्टीसाठी आलो  होतो. मुंबईत येण्याआधीच मनात ठरवलेलं कि माझ्या हातातील ते दिवस मी कुटुंब आणि मित्रांसोबत खर्ची लावणार. किरण आणि सौरभ हे माझे शाळेपासूनचे मित्र तसे माझे नावही सौरभ आहे पण हा निव्वळ योगायोग समजावा.

मी आल्यामुळे ते दोघे तर खुशीत होतेच पण त्याहूनही जास्त आनंद हा मला त्यांना तब्बल दोन वर्षांनी पहिल्यांदाच समोर पाहिल्यावर झाला.  मुंबईत आल्यापासून कुठे तरी एक मोठा प्रवास मित्रांबरोबर करावा अशी सुप्त इच्छा माझ्या मनात दरदिवशी यायची आणि ती इच्छा पूर्ण व्हावी हा एकच हेतू मनाशी बाळगून ती मी किरण आणि सौरभला सांगितली. खरे तर याआधी आम्ही कधीही एकत्र मुंबई बाहेर प्रवास केला नव्हता त्यामुळे माझ्या इच्छेला त्यांच्याकडून कितपत मान्यता मिळेल ह्याबाबत मला जरा शंका होती पण त्यांनीही कूठलीही

कारणे न देता संमती दर्शवली. कुठे तरी प्रवास करायचा हे ठरवून झालेले पण नक्की कुठे जायचे यावर कुणाचे एकमत नव्हते. आता त्यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी माझ्या घराखालील बसस्टोप वर आमच्या तिघांच्या दरदिवशी बैठकी व्हायच्या पण प्रवासाच्या ठिकाणावर काही केल्या एकमत होत नव्हते. शेवटी मीच सुचवले सिंधुदुर्ग- देवगड आणि मग सौरभ आणि किरण ने लगेच त्याला संमत्ती दर्शवली. खरे तर सिंधुदुर्ग- देवगडमध्ये या दोघांची गावे आहेत हे मला आधीपासूनच माहिती होते आणि त्यामुळे त्या दोघांचा याला विरोध होणे शक्य नव्हते याची कल्पना मला होती. आम्ही सन्मान आणि सिद्धेश अशा अजून दोन मित्रांना याबद्दल कल्पना दिली आणि त्यांनीही त्यावेळी येण्याची तयारी दाखवली पण ऐन वेळी काहीतरी कारणे देत त्या दोघांनी स्वतःला अलिप्तच ठेवले आणि शेवटी आम्ही तिघेच प्रवासाला जायचे ठरले.



दिवस ठरला, आणि आम्ही तिघे लालबाग-परेल वरून देवगडला जाणाऱ्या बसमध्ये रात्री बसलो. सिंधुदुर्ग-देवगडला मी आयुष्यात प्रथमच चालेलो बाकी इतर वेळेस किरण कडून निसर्ग सौंदर्यच्या गोष्टी ऐकून होतो. त्यामुळे माझ्या मनात कधी एकदा सकाळ होते आणि कल्पनेत उतरवलेले सौंदर्य मी बघतो याचाच विचार चालू होता. बसमध्ये थोड्या गप्पा रंगल्या आणि टीव्ही वर लावलेला अग्ग बाई अरेचा चित्रपट बघत कधी झोपी गेलो ते कळलेच नाही. माझ्या मागच्या सीट वर सौरभ बसलेला आणि सौरभ च्या बाजूला एक माणूस दारू ढोसून बंद असलेल्या मोबाईल वर काहीतरी पुटपुटत होता आणि सौरभला थोड्या-थोड्या वेळाने घड्याळात बघून वेळ विचारात होता. बिचारा सौरभ त्या बेवड्या मुळे रात्रभर जागा राहिला आणि आम्ही मात्र मस्त घोरत रात्र घालवली.

सकाळी खिडकीतून आत येणाऱ्या सूर्याच्या किरणांनी आणि मातीतून सुटलेल्या सुगंधाने मी झोपेतून उठलो आणि डोळे किलकिले करून खिडकीच्या बाहेर हिरवळीला



निरखू लागलो. बसच्या दोन्ही बाजूला लांबच लांब हिरवळ होती. हवेत गारवा आणि सुगंध सुटलेला. त्या प्रथम दर्शी सौंदर्यनेच अंगावरची मरगळ कधी उत्साहात परावर्तित झाली ते माझंही मलाच कळले नाही.



शेवटी आम्ही देवगडमध्ये अंतिम ठिकाणी येऊन पोहोचलो. जवळच हॉटेल अलंकारमध्ये राहण्याचा प्लॅन आम्ही आधीच केला होता पण बस मधून उतरल्यावर बाजूलाच असलेल्या तारामुंबरी बीच जवळ नावगेंच्या किनारा गेस्ट हाऊसच्या जाहिरातीवर लक्ष गेले आणि तिथेच राहण्याचा प्लॅन ऐन वेळेला झाला.

# समुद्रमोहिनी







तारामुंबरी बीचला अगदी लागूनच त्यांचे गेस्ट हाऊस आहे. त्या गेस्ट हाऊस वरून समोरच्या अथांग अशा अरबी समुद्राचे दर्शन होते. त्या समुद्राचे विराट रूप, त्याच्या लाटांचा आवाज, आकाशात उडणाऱ्या पक्षांचा थवा, किनाऱ्यालगत बिनधास्त पोहोणारी गावातली मुले, मच्छिमारीसाठी समुद्रात जाळे फेकून माशांच्या प्रतीक्षेत असलेले कोळी लोक आणि किनाऱ्यालागत बांधलेल्या होडी या सर्व गोष्टी वातावरणात एक प्रकारचा तजेला निर्माण करत होत्या. शहरात राहून या गोष्टी अनुभवणे खरंच कठीण होते. आम्ही सर्वानी गेस्ट हाऊस वर गेल्या गेल्या अंघोळी करून घेतल्या आणि नावगेंनी आणलेल्या चहाचा आणि सौरभ ने आणलेल्या फरसाणाचा आस्वाद घेतला. खाली आम्ही आधीच बुक केलेला गाडीवाला त्याची गाडी घेऊन आमची वाट बघत होता.



# कुणकेश्वर मंदिर:

पहिल्या दिवसाची सुरुवात आम्ही कुणकेश्वर मंदिरापासून करण्याचे ठरविले. तारामुंबरी बीच पासून कुणकेश्वर मंदिराला गाडीने जायला साधारण १५ मिनिटे लागतात. जसे जसे मंदिर जवळ येऊ लागते तसे तसे खवळणाऱ्या समुद्राच्या लाटांचा आवाज कानी पडू लागतो. दुरूनच मंदिराच्या कळसाचे आणि मागे अरेबीयन समुद्राचे दर्शन घडते.





कणकेच्या बनात बसलेला देव म्हणजे शम्भू महादेव आणि त्यावरुनच गावाचं नाव पडले ते कुणकेश्वर. कुणकेश्वर हे कुणकेश्वर मंदिरासाठी आणि देश-विदेशात ख्याती असलेल्या हापूस आंब्यासाठी प्रसिद्ध आहे.

दरवर्षी महाशिवरात्रीला भरणाऱ्या कुणकेश्वर यात्रेला देश-विदेशातून यात्रेकरु उत्साहाने सहभागी होत असतात. समुद्रसपाटी पासून साधारण २० ते २५ मीटर उंचीवर वसलेले हे प्राचीन कुणकेश्वराचे मंदिर म्हणजे एक पवित्र तीर्थक्षेत्र.

खवळणाऱ्या समुद्राच्या भल्या-मोठ्या लाटांपासून समुद्राजवळील मंदिराचा भाग बांधीव तटाने सुरक्षित राखला आहे.



मंदिराचे अद्‌भुत कोरीव काम, विविध देवतांच्या विलोभनीय आणि दुर्मिळ अशा मुर्त्या, मागे खवळणाऱ्या सागराच्या लाटांचा आवाज आणि हवेत सुटलेला गारवा आणि सुगंध जणू स्वर्गसुखाची अनुभूती देतात.

अष्टकोनी आकारात असलेल्या मंदिराच्या महत्वाच्या जागी महादेवाची मूर्ती असून भवतालच्या जागी असलेली छोटी मंदिरे सभामंडप आणि दीपवृक्षांनी नटलेली आहेत.

मंदिरा जवळच असलेल्या छोट्या गुहा आणि त्यांच्यावर असलेले स्त्री आणि पुरुष योद्धांचे नक्षीकाम म्हणजे शिल्पकलेचा उत्तम नमुनाच म्हणावा लागेल. मंदिरात आल्यानंतर २ ते ३ तास कसे गेले ते आम्हालाच कळले नाही.







मंदिरात घालवलेले अविस्मरणीय क्षण मनात साठवून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो.

कुणकेश्वर मंदिरातून बाहेर पडल्यावर आम्ही थोडा वेळ कुणकेश्वर बीच वर घालवून पुढे प्रसिद्ध दाभोळे-पोखरबाव  सिद्धिविनायक मंदिराकडे मार्गस्थ झालो.

# दाभोळे-पोखरबाव गणेश मंदीर

साधारण कुणकेश्वर पासून १० किलोमीटर अंतरावर वारेरी-तळेबाजार मागार्वर स्थापन्न झालेले हे प्रसिद्ध सिद्धिविनायक गणेश मंदिर. इथे पोहोचण्यास आम्हाला कुणकेश्वरपासून अंदाजे १५ मिनिटे लागली. हे जागृत देवस्थान मानले जात असून याची स्थापना पांडवांनी केली असल्याचे म्हटले जाते.



हे मंदीर बाहेरून बघीतल्यास प्रथम दर्शी लहान दिसते परंतु त्याची भव्यता आपणास आत गेल्यावरच समजते. मंदिरात वरचा भाग आणि खालचा भाग असे दोन भाग आहेत. वरच्या भागात गणेश मंदिर असून त्यात गणेशाच्या अप्रतीम मूर्तीची स्थापना करण्यात आलेली आहे.









मंदिराचा परीसर हा सूर्यफूल, झेंडू अशा एक ना अनेक प्रकारच्या फुलांनी सजून गेलेला आपणास दीसतो. मंदिराच्या खालच्या भागात जाण्यासाठी पायऱ्यांची व्यवस्था करण्यात आली असून तिथे कासवाच्या आकारातील मूर्तीवर असलेले शिवलिंग आपल्याला

दिसते. खाली एक पाण्याचा छोटा प्रवाह वर्षाचे बाराही महिने मंदिराच्या परिसरातून वाहत असलेला आपण बघू शकतो  हा नैसर्गिक पाण्याचा स्रोत मंदिराचा परिसर थंड ठेवण्यात मदत करतो. मंदिरातल्या गारव्याने आणि फुलांच्या सुगंधाने आम्ही पुन्हा एकदा प्रसन्न  मनाने मंदिरातील गणपतीचे आणि शंकराचे दर्शन घेतले आणि आमच्या पुढच्या प्रवासाला निघालो.

सिंधुदुर्ग जिल्ह्याला सागरी तटाची निसर्गाकडून मिळालेली देणगीच म्हणावी लागेल. आचरा, तोंडवली, वायंगणी, कोलंब, तळाशील, तारकर्ली, देवबाग, चिवला, वेंगुर्ला, शिरोडा, निवटी, मिठबाव, मुनागे, सागरेश्वर, कुणकेश्वर, मोचेमाड, प्याराडीस,  मिठमुंबरी,  तारामुंबारी असे अनेक सागरी तट सिंधुदुर्ग जिल्ह्याची शोभा द्विगुणित करतात  आणि म्हणूनच पर्यटक मोठ्या संख्येने सिंधुदुर्ग जिल्ह्याला भेट देतात.





दाभोळे-पोखरबाव गणेश मंदिरातून बाहेर पडल्यावर मालवणच्या दिशेने जाताना आम्ही मध्ये गाडी थांबवली ती आचऱ्याला.

# आचरा

सिंधुदुर्ग जिल्ह्यात   मालवण तालुक्यातील आचरा हे प्राचीन समुद्र तटासाठी प्रसीध्द असलेले छोटेसे गाव.  आचरा बीच हा संथ पाण्याच्या प्रवाहासाठी आणि त्याचबरोबरीने किनाऱ्यावर दिसणाऱ्या वेगवेळ्या पक्षांच्या जातींसाठी प्रसिध्द आहे. वेगवेळ्या ऋतूंनुसार इथे पक्ष्यांच्या वेगवेगळ्या जाती स्थलांतरित होत असल्याचे दिसते. किनाऱ्यावर उजव्या दिशेला असलेल्या पहाडावरील प्रकाशस्तंभ  किनाऱ्याच्या सुंदरतेत  भर घालत असल्याचे आपण बघू शकतो. समुद्रतटा बरोबरीनेच आचरा गाव प्रसिद्ध आहे ते इथे असलेल्या प्राचीन आणि प्रसीध्द रामेश्वर मंदिरासाठी.   रामनवमी,   पाडवा,   गणेशोत्सव अशा अनेक सणांच्या दिवशी या मंदिरात मोठा उत्सव साजरा  करण्यात येतो आणि त्याचा अनुभव घेण्यासाठी भाविक महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून आचऱ्याला येत असतात.

गावात फिरून फिरून आमचे पाय तर चांगलेच दुखायला लागलेले आणि त्यातच पोटात भुकेने  कावळेही ओरडायला लागलेले. आम्ही लगेच आमच्या ड्राइवरला कल्पना दिली आणि त्याने ताबडतोब गाडी वळवली ती हॉटेल अतिथी बांबू कडे.

हॉटेल अतिथी बांबू

हॉटेल अतिथी बांबू हे मालवण मधील कोठेवाडा गावाजवळ अगदी मोक्याच्या ठिकाणी बांधलेले आहे. आचऱ्यापासून साधारण २० किलोमीटर म्हणजेच अर्ध्या तासावर आणि चिवला बीच पासून अगदी  १० मिनीटे अंतरावर असलेले हे अतिथी बांबू हॉटेल म्हणजे खवय्यांसाठी आणि खास करून मांसाहारींसाठी एक प्रकारच्या मेजवानीचे ठिकाण म्हटले पाहिजे. मालवणात  येऊन अतिथी बांबूमध्ये  न जेवणे म्हणजे आग्र्याला जाऊन ताजमहालचे दर्शन न घेण्यासारखे होईल. इथे अनेक अशा प्रकारच्या माशांचे चविष्ट प्रकार मिळतात कि मी त्या माशांची नावे पहिल्यांदाच ऐकली होती.  मोरी,   सुरमयी,   तिसरे,   सरंगा,   पापलेट,   खेकडा,   तामोशी,   बानोशी,   म्हाकूले,   कोळंबी,   कालवा,   सौंदाळा,   बांगडा अशा एक ना अनेक प्रकारच्या माशांची व्यंजने तुम्हाला चाखायला मिळतील आणि हेच कमी कि काय म्हणून सोबतीला चिकन,   मटण,   गावठी कोंबडी मेनूकार्ड वर आहेतच. इथे तुम्हाला वर्षाचे बारा ही महिने सर्वप्रकारच्या माशांची व्यंजने मिळतात.  तिथे बसल्या बसल्या नुसत्या वासानेच मन चलबिचल होऊन कधी एकदा ऑर्डर दिलेली थाळी फुड्यात येते असे होते.

मांसाहारी प्रमाणेच शाकाहारींचीही त्यांनी योग्य ती सोय केलेली आहे. ताक, सोलकढी, आमरस, गोड डाळ आणि वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्यांची चव येते चाखायला मिळते.



मी आणि सौरभ ने म्हाकूल, बांगडा, तिसरे आणि कोळंबी फ्राय ची ऑर्डर दिली. किरणला कुठे नको ती दुर्बुद्धी सुचली आणि मांसाहारी असूनही त्याने शाकाहारीच्या थाळीवर समाधान मानले. पोटभर जेवल्यानंतर खाल्लेले जिरवण्यासाठी आम्ही बाहेर पडलो आणी जवळच असलेल्या चिवला बीचला निघालो.





# चिवला बीच

खाल्लेलं पचवण्यासाठी आम्ही जवळच १० मिनिटांच्या अंतरावर असलेल्या चिवला बीच वर मार्गस्थ झालो. स्वच्छ आणि पारदर्शक पाण्याचा प्रवाहाचा अनुभव घ्यायचा असेल तर चिवला बीचला नक्कीच भेट देणे आवश्यक आहे. तारामुंबरी बीच, मिठमुंबरी बीच, देवगड बीच, कुणकेश्वर बीच अशा अनेक नावाजलेल्या बीच पासून चिवला बीच हा तसा नामानिराळाच आणि म्हणूनच कमी गर्दीसाठी प्रसिद्ध असलेला पण निसर्गसौंदर्याच्या दृष्टीने दुसऱ्या कोणत्याही समुद्र तटाला लाजवेल असा आहे.










उंचच उंच नारळाची झाडे आणि त्याखाली पर्यटकांसाठी केलेली बसण्याची सोय या समुद्र तटाची शोभा वाढवते. आता वाढत्या ख्याती मुळे या बीच वरही पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढताना आपल्याला बघावयास मिळते. महाराष्ट्र पर्यटन विभागानेही चिवला बीचच्या सुशोभीकरण आणि देखभालाची योग्य ती खबरदारी घेतल्याचे दिसते. चिवला बीच वर थोडे फिरून वामकुक्षी घेऊन आम्ही पुढे निघालो ते पाण्यात वसलेलया सिंधुदुर्ग किल्ल्यावर.

# सिंधुदुर्ग किल्ला

साधारणतः चिवला बीच पासून सिंधुदुर्ग किल्ल्यावर पोहोचण्यास आम्हाला दीड तास लागले. आम्ही  तारामुंबरीला परतीच्या प्रवासाला जातानाच वाटेत सिंधुदुर्ग किल्ला करण्याचे ठरवले.



कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमध्ये अरबी समुद्रात वसलेला हा सिंधुदुर्ग किल्ला म्हणजे शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा उत्तम नमूनाच म्हणावा लागेल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ह्या किल्ल्याची स्थापना साधारण इ.स. १६६४ मध्ये नोव्हेंबर महिन्यात केली होती.  महाराजांकडे साधारण ३६२ किल्ले होते. जमिनी आणि डोंगरी किल्ल्यांच्या बरोबरीनेच सागरीमार्गे येणाऱ्या शत्रूंचा सामना करण्यासाठी जलदुर्गाची निर्मिती

महत्वाची आहे हे महाराजांनी ओळखून सागरी किल्ल्यांची निर्मिती केली. या किल्ल्याच्या निर्मितीसाठी बराचसा खर्च आणि साधारणतः ३ वर्षे इतका कालावधी लागला. हा किल्ला मालवण पासून अंदाजे अर्धा मैल समुद्रात असून कुरटे खडकाच्या बेटावर याची स्थापना करण्यात आली आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी पर्यटकांसाठी बोटीची व्यवस्था करण्यात आली आहे. किल्ल्यावर गोड्या पाण्याच्या ३ विहिरीही आहेत आणि त्या विहीरीना दूधबाव, दहीबाव आणि साखरबाव अशी नावे ठेवली आहेत. समुद्रात असूनही खाऱ्या पाण्याचा स्पर्श या विहिरीतल्या पाण्याला झाला नाही हे एक वैशिष्ट आहे. सिंधुदुर्ग किल्ल्याचे प्रमुख वैशिष्ठ म्हणजे इथे दर बारा वर्षांनी शिवराजेश्वर येथे येणारी रामेश्वराची पालखी.

आम्ही हा किल्ला पाहण्यासाठी थोडे उशिराच पोहोचलो त्यामुळे या किल्ल्याचे आतून दर्शन घेता न आल्याने आम्ही थोडे नाराज होतोच पण सर्वानी हा किल्ला या आधी ही पहिला असल्याने आम्हाला जास्त हिरमुसण्याचे कारण नव्हते. आम्ही दुरूनच या किल्ल्याचे दर्शन घेऊन तारामुंबरीला हॉटेल निवाराकडे निघालो.

दिवसभर फिरून आम्ही फारच थकून गेलो होतो. अंदाजे एका तासाचे अंतर पार करून आम्ही आमच्या खोलीत पोहोचलो. पोटात कडाक्याची भूक तर लागलेलीच पण त्याहूनही जास्त थकल्यामुळे डोळ्यांवर आलेल्या झोपेचा प्रश्न तर होताच. नावगेंकडे घरगुती पद्धतीचे जेवण मिळते हे त्यांनी आम्हाला सकाळीच सांगितले होते त्यामुळे नावगेंना आमच्या रात्रीच्या जेवणाची ऑर्डर दिली आणि जेवण तयार होई पर्यंत आम्ही आमच्या पुढच्या दीवसाच्या कार्यक्रमाची आखणी करू लागलो.





साधारणतः आमच्या खोलीपासून नावगेंच्या घरापासूनचे अंतर १० मिनिटे होते आणि वाटेवर दाट अंधार. त्यांच्याघरापर्यंत जाई पर्यंत आमच्या पायावरून किती बेडके आणि खेकडे गेले हे देव जाणे.







जेवणाची उत्तम व्यवस्था त्यांनी आमच्यासाठी केली होती. खास माझ्यासाठी आणि सौरभसाठी माशाची थाळी तर किरण साठी शाकाहारी थाळी बनवली होती. तिथे पोटभर जेवून आम्ही पुन्हा आमच्या खोलीवर येऊन झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही मुद्दामच लवकर उठलो कारण आमची अजून खूप ठिकाणे बघायची राहून गेली होती. सकाळी उठून समुद्रातच आंघोळ करायचे ठरले. किनाऱ्यालगतच गावातली तरुण मुले आमच्या आधीच येऊन मनसोक्तपणे समुद्रात डुबक्या घेत होती . बाजूलाच काही कोळी लोक पाण्यात जाळे फेकून मासे पकडत होती. त्यातच आम्हाला नावगे काका दिसले आणि मग आम्ही ही त्यांच्याजवळ जाऊन मासे पकडण्याचे प्रशिक्षण घेऊ लागलो.





प्रथमदृष्टी ३६० अंशात जाळे फीरवून पाण्यात टाकणे आणि जाळ्यात अडकलेले मासे बाहेर काढणे आम्हाला फार सोपे वाटले पण जेव्हा आम्ही जाळे हातात घेतले तेव्हा त्यातल्या मेहनतीची जाणीव झाली. सुरुवातीला जाळ्याऐवजी आम्हीच पाण्यात पडलो पण नंतर १० ते १५ प्रयत्नानंतर आम्ही ते जाळे पाण्यात टाकण्यात अर्धे यशस्वी झालो.



आम्ही ती संपूर्ण प्रक्रिया अनुभवली आणि त्याचा आनंद ही घेतला आणि नावगे काका सुद्धा चेहऱ्यावर कोणते ही भाव न आणता आम्हाला शिकवत होते. त्यांनी एका वेळेस जेवढे मासे त्या जाळ्यात पकडले असतील त्याच्या अर्धे ही आम्हाला आमच्या १० ते १५ प्रयत्नात पकडता आले नाहीत. शेवटी हे आपल्याला झेपणाऱ्यातले नाही याची जाणीव होऊन आम्ही ते जाळे नावगेंच्या हातात सुपूर्द केले आणी तिथून काढता पाय घेतला.

समुद्रात पोहण्याचा आणी डुबक्या मारण्याचा मनसोक्त आनंद लुटल्यानांतर आम्ही सर्वांनी आमच्या खोलीत येऊन अंघोळी केल्या आणी नेहमी प्रमाणे सौरभ ने आणलेल्या फरसाणाचा आणि नावगेंनी आणलेल्या पोहे आणी चहाचा आस्वाद घेतला. खाली तोपर्यंत ठरलेल्या वेळेनुसार गाडीवाला त्याची गाडी घेऊन आमची वाट बघत होता.

दुसऱ्या दिवसाची सुरुवातही देवदर्शनाने करावी असे ठरवून आम्ही तारामुंबरीतून निघालो ते थेट विमलेश्वर मंदिराकडे. विमलेश्वर मंदिर हे तारामुंबरी बीच पासून साधारण १२ किलोमीटर अंतरावर असून तिथे जाण्याच्या मार्गावर आपल्याला लागतो तो पडेल पूल

पडेल पूल



तारामुंबरी बीच पासून विमलेश्वर मंदिराकडे निघाल्यास वाटेत १५ मिनीटे अंतरावर आपल्याला हा पूल लागतो. ह्या पुलाचे बांधकाम गामोन इंडिया या कंपनीने केले असून हा पूल राजापूर आणि देवगड मधील छोट्या गावांना जोडण्याची महत्वपूर्ण भूमिका बजावत असल्याचे आपण बघू शकतो. पुलाच्या सुरुवातीला आणि शेवटाला मोठमोठी वृक्षे पुलाच्या सौंदर्येत भर घालतात. समुद्रावर बांधलेल्या या पुलाच्या एका बाजूला खाली पाण्यालगत वाडातर गावातील हनुमानाचे नयनरम्य मंदिर आपण पाहू शकतो. या पुलाची निसर्गसौंदर्यता पाहून आम्ही सेल्फ़ी आणि फोटो काढण्याचा मोह मात्र आवरू शकलो नाही. साधारण १५ मिनिटे त्या पुलावर घालवल्यावर आम्ही विमलेश्वर मंदिराकडे निघालो.

पुलावरून दिसणारे दृश्य



# विमलेश्वर मंदिर




विमलेश्वर मंदिर हे भगवान शंकराचे मंदिर असून देवगड तालुक्यातील वाडा-गुरव वाडी गावात बांधलेले आहे. मंदिरा भवतीचा परिसर हा नारळाच्या आणि सुपारीच्या झाडांनी घेरला असून मंदिरामागे असलेल्या इतिहासाची माहिती आपणास गावातील लोकांकडून ऐकावयास मिळते. मंदिराची निर्मिती भल्यामोठ्या अखंड जांभ्या दगडातून करण्यात आलेली आहे. पांडवांच्या काळात या मंदिराची निर्मिती करण्यात आल्याचे म्हटले जाते. मंदिराच्या प्रवेशद्वारा जवळ देवांच्या ५ मुर्त्या असून मंदिराच्या दोन्ही बाजूस हत्तीच्या भल्या मोठ्या मुर्त्या कोरण्यात आलेल्या आहेत.









विमलेश्वराची मूर्ती साधारणतः गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारापासून १२ फूट आत असल्याचे दिसते. गाभाऱ्यात एखाद्या गुहेला लाजवेल अशी शांतता आपण अनुभव शकतो. गाभाऱ्यातुन आत बाहेर करणारी वटवागूळे मंदिराच्या शांततेचा अनुभव घेत असल्याचे आपण बघू शकतो. मंदिराच्या भवताली असलेली झाडे आणि खालून वाहणारा पाण्याचा प्रवाह मंदिराचा परिसर थंड ठेवण्यात मदत करतात. मंदिराची आणि भवतालच्या परिसराची डागडूजीही नियमितपणे करण्यात येत असणार याचा अंदाज मंदिराभवतीची स्वछता बघून लावता येतो. गोजिरी आणि हापूस अशा मराठी चित्रपटाचे चित्रीकरणही या मंदिराच्या परिसरात चित्रित झाल्याचे समजते. मंदिरातील सकारात्मक ऊर्जा शरीरात साठवून साधारण ३५ ते ४० मिनिटानि आम्ही निघालो ते आमच्या पुढच्या ठिकाणाला ते विजयदुर्गाकडे.

विमलेश्वरपासून विजयदुर्ग किल्ला हा साधारण २० किलोमीटर अंतरावर असून वाटेत वाडा, पुराळ, काळंबाई, हुर्शी अशा गावातून आम्हाला विजयदुर्गकिल्ल्याला पोहोचण्यास अर्धा तास लागला.

# किल्ले विजयदुर्ग



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिंधुदुर्ग किल्ल्यानंतर अजून एक जलदुर्ग म्हणजे विजयदुर्ग. विजयदुर्ग किल्ला. शिलाहार घराण्यातील राजा भोजने ११ व्या शतकाच्या अखेरीस बांधलेला किल्ला असून शिवाजी महाराजांनी १६५३ मध्ये हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला आणि नंतर त्याची पुनर्बांधणी केली. कान्होजी आंग्रे व तुळोजी आंग्रे हे त्यावेळेस गडावरील शिलेदार होते . मधल्या काळात हा किल्ला १२ व्या शतकात देवगिरीतील यादव आणि १३ व्या शतकात विजयनगरच्या राजाच्या ताब्यात होता. १७व्या शतकात इंग्रजांनी हा किल्ला ताब्यात घेण्यासाठी प्रचंड आरमारानिशी सागरी मार्गे किल्ल्यावर हल्ला केला परंतु त्यावेळी रुद्राजी धुळप यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी केलेल्या प्रतिकारामुळे आणि किल्ल्याच्या ठिकाणामुळे इंग्रजांच्याच नौदलाचे मोठे नुकसान झाले. पुढे १८व्या शतकात पेशव्यांच्या अस्तानंतर हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात आला. किल्ला मोक्याच्या ठिकाणी बांधलेला असल्या कारणांनी कोणालाही सहजासहजी जिंकणे अवघडच होते आणि म्हणूनच अशा या अजिंक्य किल्ल्याला पूर्वेकडील जिब्राल्टर असेही संबोधले जाते. ४० किलोमीटर लांब असलेली वाघोटन खाडी हे या किल्ल्याचे बलस्थान आहे. कारण मोठी जहाजे खाडीच्या उथळ पाण्यात येऊ शकत नसत आणि मराठी आरमारातील छोटी जहाजे या खाडीत नांगरून ठेवली जात, पण ती समुद्रावरून दिसत नसत.




ACC
ACC

या किल्ल्याला तीन तटबंदी असून त्यांच्या तीन बाजू पाण्याने घेरलेल्या आहेत. त्यांना चिलखती तटबंदी असेही म्हटले जाते. या किल्ल्यावर दोन भुयारी मार्गही आहेत जेणेकरून जर शत्रू वरचढ ठरलाच तर या भुयारी मार्गातून किल्ल्यावरील स्त्रियांना आणि लहान मुलांना सुखरूप अज्ञात स्थळी घेऊन जाता यावे हा त्या मागचा उद्देश होता.

किल्ल्याची संपूर्ण माहिती आपल्याला किल्ल्यात शिरता क्षणीच तिथे असलेल्या स्थानिक मार्गदर्शकाकडून मिळते . किल्ल्याच्या सुरुवातीलाच आपण किल्ल्याच्या भिंतीवर असलेल्या तोफेतुन निघालेल्या तोफगोळ्यांच्या खुणा आजही बघू शकतो. किल्ल्यावर असलेले हनुमानाचे मंदिर हे शिवाजी महाराजांच्या काळातच बांधले असल्याचे म्हटले जाते. किल्ल्यावर आजही पुरातन तोफा आणि तोफगोळे आपण पाहू शकतो. किल्ल्यावरील दारू कोठार, जखनीची तोफ, हौद, चुनाचा घाणा, जखीण मंदिर, आणि बुरुजे आजही इतिहासाची जाणीव करून दिल्याशिवाय राहत नाहीत. आजही किल्ल्यावर स्थानिक रहिवासी घरे बांधून राहत असल्याचे आपण बघू शकतो.

















संपूर्ण किल्ला बघण्यात आणि मार्गदर्शकाकडून किल्ल्याच्या इतिहासाची माहिती समजून घेण्यास आम्हाला दीड ते दोन तास लागले पण ते क्षण आम्हाला पुन्हा एकदा इतिहासात घेऊन गेल्यासारखे वाटले. किल्ल्यावर घालवलेले क्षण मनात साठवून आम्ही पुढे निघालो ते किरणच्या गावी म्हणजेच वानिवडेला.

# वानिवडे

वानिवडे हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील छोटेसे गाव. गावात शिरता क्षणीच गावातील आणि शहरातील तफावत आपणास अनुभवायला मिळते. गाव सुरु होताच हळू हळू डांबरी रस्त्याची जागा मातीचे रस्ते घेत असल्याचे दिसते. गावातील स्थानिक रहिवासी आजही उपजीविकेचे साधन म्हणून शेती करतात.भोवतालचा परिसर हा हिरवळीने आच्छादलेला बघावयास मिळतो . गावातील निरव शांतता  गावाच्या अस्तित्वाची जाणीव करून देते.











गावातील मुलांना आजही शाळेत जाण्यासाठी होडीतून नदी पार करावी लागते आणि कधी नदीला पूर आला तरी शाळेला सुट्टी न घेता हि मुले नदी पार करण्याचे धाडस करत असल्याचे समजते. एवढ्या सर्व अडचणींचा सामना करून सुद्धा गावातील रहिवासांच्या चेहऱ्यावर असलेले समाधान आणि प्रसन्नता यातून शहरातील लोकांना बरेच शिकण्यासारखे आहे. गावची थंड हवा, शुद्ध पाणी, योग्य आहार आणि प्रसन्न व्यक्तिमत्व या कारणांमुळेच गावातील लोक दीर्घायुषी होत असावेत. वानिवडे गावाला मुळातच निसर्ग सौंदर्य लाभलेले असून बाहेरून येणाऱ्या प्रत्येक माणसाला या गावाने भुरळ घातली नाही तर नवलच. गावाजवळच भावई देवीचे मंदिर असून त्यात देवीच्या अप्रतिम मूर्तीची स्थापना करण्यात आलेली आहे.



# दहिबाव

वनिवाडे गावातून आम्ही पुढे निघालो ते सौरभच्या गावी दहीबावला. दहीबाव हे देवगड जिल्ह्यातील आचरा-देवगड मार्गावर वसलेले साधारण २५०० ते ३००० लोकसंख्या असलेले गाव. गावातील लोकांनी आजही मालवणी भाषा जपली असल्याची दिसते. शेतीबरोबरच जोड धंदा म्हणून मूर्ती काम आणि व्यापार हे स्थानिकांचे उपाजीविकेचे प्रमुख साधन. गणेशोत्सवात सार्वजनिक आणि घरगुती गणपतीच्या मुर्त्यांसाठी आजही येतील मूर्तिकारांकडे भरपूर प्रमाणात महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या शहरातून मागण्या येतात.



आचरा-देवगड मार्ग,  व्यापार,  नवीन बांधण्यात आलेल्या सरकारी आणि खाजगी शाळा आणि मुबलक प्रमाणात असलेली जमीन यामुळे अनेक बांधकाम व्यावसायिक इथे आकर्षित झाल्याचे दिसते.

साधारण रात्री ८ वाजता आम्ही परत तारामुंबरी बीच वर आमच्या खोलीवर आलो आणि नावगेंनि बनवलेल्या माशाच्या थाळीवर ताव मारून आमच्या खोलीत झोपून गेलो.



सकाळी जरा उशिराच उठणे झाले कारण आता  जायचा  दिवस आला होता आणि कोणालाच त्यात उत्सुकता नव्हती. आमचा देवगड किल्ला अजून काबीज करण्याचा राहिला होता. साधारण मुंबईला जाणाऱ्या आमच्या बससाठी अजून ४ तास  होते आणि तेवढा वेळ आमच्यासाठी पुरेसा होता. सगळ्यांनी फटाफट नाश्ता केला आणि आणि एखाद्या मावळ्या प्रमाणे देवगड किल्ला कूच करण्यास सज्ज झालो..

# देवगड किल्ला

आम्ही दोन  दिवसांसाठीच गाडी बुक केली असल्या कारणाने तिसऱ्या दिवशी देवगड किल्ल्यावर आम्हाला पायीच जावे लागणार होते. साधारण तारामुंबरी बीच पासून देवगड किल्ला हा ३ किलोमीटर म्हणजेच गाडीने १० मिनिटे पण आम्ही तो पायीच सर करण्याचे ठरवले.





अरबी समुद्र आणि देवगड खाडी यांच्या संगमामध्ये वसलेला हा देवगड किल्ला मराठी नौसेना अधिकारी दत्ताजीवराज आंग्रे यांनी सन १७२९ साली समुद्रातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी बांधला होता. पुढे इंग्रजांनी या किल्ल्यावर चढाया करून तो आपल्या ताब्यात घेतला. किल्ल्याच्या भवताली पाणी असल्या कारणाने किल्ल्याला जंजिरे(अरेबिकमध्ये आइसलँड ) देवगड असेही संबोधले जाते. किल्ल्यावर जाणाऱ्या वाटेवरून अरबी समुद्राचे विराट रूप आपल्याला बघायला मिळते. जामसंडे गावातील समुद्राला लागूनच असलेल्या उंच पवनचक्क्या नजरेस पडतात. कमी पैशातून वीज निर्मितीसाठी या पवनचक्क्यांचा उपयोग केला जातो.





किल्ला हा उंच टेकडी वर असून टेकडीच्या सुरुवातीला वस्त्या आणि वस्त्यांच्या बाजूने जाणाऱ्या गल्लीत पुढे असलेला एक बुरुज आणि वस्ती संपल्यावर बालेकिल्ल्याकडे जातांना उजव्या बाजूला २ सुटे बुरुज. हे तीनही टेहळणी बुरुज असून त्यांचा उपयोग समुद्रावर, बंदरावर व आजूबाजूच्या परीसरावर लक्ष ठेवण्यासाठी होत असे.






किल्ल्यावर पोहोचता क्षणीच दर्शन होते ते किल्ल्यावर असलेले गणपती मंदिराचे. इतर किल्ल्यांपेक्षा हा किल्ला वेगळाच म्हणावा लागेल कारण हा किल्ला बांधण्यामागचा उद्देशही तसा वेगळाच. किल्ल्यावर आजही त्यावेळच्या ३ तोफांचे आणि प्रकाशस्तंभाचे दर्शन होते. किल्ल्यावरील बराचसा भाग हा सपाट आणि मोकळा असून किल्ला समुद्रसपाटीपासून उंचीवर असल्याकारणाने हवेचे प्रमाणही जास्त आहे त्यामुळे किल्ला चढून गेल्यावर सुद्धा दमल्याचा भास होत नाही. या किल्ल्यावर सूर्यास्ताचे अप्रतिम दर्शन घेण्यासाठी पर्यटक खास दूरवरून येतात. देवगड किल्ल्यावर त्यावेळी आमच्याखेरीस दुसरे कोणीही नसल्याकारणाने आम्ही मनसोक्तपणे किल्ल्यावर चित्रीकरण केले.





तेथे घालवलेले क्षण आमच्यासाठी स्वर्गसुखापेक्षाही कमी नव्हते. सध्या  सिंधुदुर्ग, विजयदुर्ग या किल्ल्यांची देखभालही महाराष्ट्र पर्यटन संस्था घेत आहे  परंतु देवगड किल्ला मात्र एकाकी पडल्याचे चित्र आपणास दिसते.

देवगड किल्ला बघून झाल्यावर आम्ही पुन्हा एकदा तारामुंबरीमध्ये नावगेंकडे दुपारचे जेवण केले आणि आमच्या बॅगा भरून बस स्टॅण्डवर आमच्या बसची वाट पाहू लागलो. सिंधुदुर्गमधील आमचा तसा बराचसा भाग वेळेअभावी बघायचा राहिला होता पण पुढच्यावेळी तो नक्कीच बघण्याचे एकमेकांकडून आश्वासन घेऊन किरण आणि सौरभ मुंबईची बस पकडून मुंबईला गेले आणि मी पुढे माझ्या गावी कोल्हापूरला आलो.

या अडीच दिवसात मित्रांबरोबर घालवले ते क्षण हे माझ्यासाठी अविस्मरणीय असे होते आणि ते कायम तसेच स्मरणात रहावेत म्हणून या लेखाद्वारे ते तुमच्यासमोर आणण्याचा हा माझा प्रयत्न तुम्हाला नक्कीच आवडला असेल अशी अपेक्षा करतो.




देवगड
रिक्षा स्टँड
हॉटेल
संतोषी

esahity@gmail.com

जग सुंदर आहेच. पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक अणि कवी देतात. केशवसुत म्हणतात

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य "जाणवू" लागले. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्नन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, बारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी भरपूर पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला..." सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भार्तावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोना कोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com